सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## राज्य पेसा कक्ष, पुणे
### (ग्राम विकास व पंचायतराज विभाग)

यशवंतराव चव्हाण भवन, पुणे जिल्हा परिषद, पुणे (जुनी इमारत), चौथा मजला, १ वेलस्ली रोड, कँप, पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२९९७०१०० , ई-मेल – pesamaharashtra@gmail.com

जा.क्र./पेसा/आ.पे.ग्रा./९६४/२०२५-२६ दि. ११ सप्टेंबर, २०२५

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहिल्यानगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली

**विषय** :- आदर्श पेसा ग्रामपंचायती म्हणून विकसित करण्यासाठी १० ग्रामपंचायतींची निवड करणे.

**संदर्भ** :- मा. अवर सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. F.No. M-11015/117/2025-POLICY (Comp.No.:32171), दिनांक -२९ ऑगस्ट, २०२५.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रान्वये राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगामार्फत दिनांक १६ जून २०२५ रोजी पंचायती राज मंत्रालयासोबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगामार्फत दिनांक १८ जुलै २०२५ च्या पत्राद्वारे खालील निरीक्षणे पंचायतीराज मंत्रालयास सूचित करण्यात आलेली आहेत."

"पंचायती राज मंत्रालयाने अनुसूचित क्षेत्र असलेल्या प्रत्येक राज्यामध्ये किमान १० आदर्श पेसा ग्रामपंचायती विकसित कराव्यात (एकूण १००), आणि या आदर्शांवर आधारित प्रत्यक्ष क्षेत्रातील प्रशिक्षण व राज्यांमधील ज्ञान देवाण-घेवाण कार्यक्रम आयोजित करावेत." असे सुचित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्राच्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये आदर्श पेसा ग्रामपंचायत विकसित करण्यासाठी किमान १० ग्रामपंचायतींची निवड करायची आहे. त्यासाठी पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशानुसार ग्रामपंचायतींची निवड करताना प्राधान्याने खालील निकषांत बसणाऱ्या ग्रामपंचायतींना प्राधान्य द्यावे.

१. संबंधित ग्रामसभा पेसा कायद्याबाबत जागरूक असावी.
२. संबंधित ग्रामपंचायतींना पंचायती राज मंत्रालय (MoPR) किंवा राज्य सरकारकडून पुरस्कार मिळालेला असावा.

३. संबंधित ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान (RGSA) अंतर्गत पंचायत अध्ययन केंद्र (PLC) मंजूर झालेस प्राधान्य.
४. संबंधित ग्रामपंचायतीचे पंचायत प्रगती निर्देशांक (PAI) गुण चांगले असावेत.
५. संबंधित ग्रामपंचायतीमध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त असावी. तेथील आदिवासी लोकसंख्येमध्ये जर Particularly Vulnerable Tribal Groups (PVTGs) म्हणजेच "विशेषतः असुरक्षित आदिवासी गटातील" / आदिम जमाती लोकसंख्या जास्त असेल तर त्यांना प्राधान्य द्यावे.

वरील निकषात बसणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी खालील स्वरूपात एका आठवड्याच्या आत ई-मेलद्वारे पाठवावी. जेणेकरून भारत सरकारच्या पंचायतीराज मंत्रालयाला ती उपलब्ध करून देता येईल.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत | ग्रामपंचायतीतील समाविष्ट महसूल गावे | प्रत्येक गावाचा LGD कोड | सध्याचे PAI गुण | MoPR किंवा राज्य सरकार कडून पुरस्कार मिळालेला आहे/नाही (मिळाला असल्यास कोणता) | पंचायत अध्ययन केंद्र (PLC) मंजूर आहे/नाही | २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या | त्यापैकी आदिवासी लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | PVTGs/ आदिम जमातीची लोकसंख्या किती | इतर आदिवासींची लोकसंख्या किती |
| | | | | | | | | | | | |

आपल्या जिल्ह्यातील माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधितांना आदेशित करावे. ही नम्र विनंती.

**सोबत :-** संदर्भीय पत्र जोडले आहे.

**आपला,**

(स्वाक्षरी)

**(शेखर शं. सावंत)**
**संचालक, राज्य (पेसा)**
राज्य पेसा कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत:-**

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे, राज्य व्यवस्थापन कक्ष,चाफेकर मार्केट इमारत,कृषी महाविदयालय प्रवेशव्दारा समोर,शिवाजी नगर, पुणे ४११०१६ यांना उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

३. अपर आयुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, कोकण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा)- जिल्हा परिषद, पुणे, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहिल्यानगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली यांनी तात्काळ माहिती उपलब्ध करून द्यावी.